महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १२० वे | दिनांक : २४/०४/२०२६ | वार शनिवार

## संजय गायकवाड यांना काय आक्षेपार्ह वाटले ते विचारणार
## शिवीगाळ प्रकरणी मंत्री उदय सामंत यांची प्रतिक्रिया



**मुंबई :** बुलढाणाचे शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी कालच (गुरुवारी) कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित पुस्तक 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकाच्या शीर्षकावर आक्षेप घेत प्रकाशक प्रशांत आंबी यांना अत्यंत खालच्या भाषेत शिवीगाळ केली होती. या प्रकरणाची ऑडिओ क्लिप देखील चांगलीच व्हायरल झाली. त्यानंतर आज त्यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे. आता यावर शिवसेना शिंदे गटाचे नेते व मंत्री उदय सामंत यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

उसणजे गायकवाड यांनी त्या पुस्तकाबाबत नेमकी कशाबाबत भूमिका मांडली, याबाबत त्यांच्याशी बोलावे लागेल. संजय गायकवाड यांनी ते पुस्तक वाचले की नाही माहीत नाही. मी माहिती घेऊन त्यांना काय आक्षेपार्ह वाटले ते विचारेल. मी सुद्धा ते पुस्तक वाचतो, असे उदय सामंत यांनी म्हटले आहे.

पुढे बोलताना उदय सामंत यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या रिक्षा-टॅक्सीच्या संदर्भात घेतलेल्या निर्णयावर प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी अमराठी माणसाला दुखावण्याचा प्रयत्न केलेला नाही. मराठीबाबत त्यांनी जबरदस्ती केलेली नाही. मराठी प्रवाशांसोबत बोलताना टॅक्सी चालकाला मराठी भाषा आली तर सोयीस्कर होईल. तसेच राज्य सरकार शासकीय कर्मचाऱ्यांच्या विरोधात नाही. त्यांना जे आवश्यक आहे ते या आधी करून दिले आहे. त्यांच्या ज्या मागण्या आहेत त्या पूर्ण करण्याचा आम्ही प्रयत्न करू, असेही सामंत यांनी म्हटले आहे.

विधानपरिषदेच्या निवडणुकीसंदर्भात बोलताना उदय सामंत म्हणाले, महाविकास आघाडीत काय होते ते ठरू द्या. आम्ही सज्ज आहोत. तसेच पुढे बोलताना तापमान वाढीवर सामंत म्हणाले, यावर कायमस्वरूपी उपाय योजना करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. बारामती ॲग्रिकल्चर ट्रस्ट सोबत चर्चा करून काजू आणि आंबा पिकावर बदलत्या हवामानाचा परिणाम होऊ नये यासाठी उपाययोजना करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सामंत यांनी सांगितले आहे.

## अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाविरोधात छत्रपती संभाजीनगरमध्ये एल्गार



**छत्रपती संभाजीनगर :** अनुसूचित जातीच्या (SC) आरक्षण उपवर्गीकरणाच्या निर्णयाविरोधात आज, 24 एप्रिल 2026 (शुक्रवार) रोजी छत्रपती संभाजीनगरमध्ये विविध संघटनांनी एकत्र येत तीव्र संताप व्यक्त केला. 'रियल आंबेडकरवादी, समतावादी आणि संविधानवादी' पक्ष व संघटनांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाला निवेदन देऊन उपवर्गीकरणाचा निर्णय तात्काळ रद्द न केल्यास राज्यभर तीव्र जनआंदोलनाचा इशारा देण्यात आला.

आंदोलकांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, "महाराष्ट्र शासनाने कोणतीही मागणी नसताना अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण करण्याचा निर्णय घेऊन या पुरोगामी राज्याला जाती-जातीत विभागण्याचे पाप केले आहे." यावेळी आंदोलकांनी न्या. बदर समितीच्या अहवालाचा तीव्र निषेध करत शासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. उपवर्गीकरणाची ही प्रक्रिया लोकशाहीला विघातक असून ती तात्काळ थांबवावी, अशी मागणी आंबेडकरवादी संघटनांनी केली आहे.

1. महाराष्ट्रात अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण (अ, ब, क, ड) करू नये. 2. अनुसूचित जातीसह सर्वच जातींची जातनिहाय जनगणना करण्यात यावी. 3. अनुसूचित जातीतील एकूण 59 जातींचा सखोल अभ्यास करून राज्यव्यापी सार्वजनिक सुनावण्या घेतल्या जाव्यात. 4. अनुसूचित जातीची रिक्त पदे (बॅकलॉक) तात्काळ भरण्यात यावीत. 5. कोणताही निर्णय घेताना घाई न करता सर्व समाज घटकांची मते जाणून घ्यावीत. 6. खाजगी क्षेत्रातही अनुसूचित जातीला आरक्षण लागू करावे. 7. सार्वजनिक न केलेला न्या. बदर समितीचा अहवाल तात्काळ रद्द करावा. 8. अनुसूचित जाती व जमातींना स्वतंत्र मतदारसंघ देण्यात यावेत.

या आंदोलनात विविध संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यामध्ये प्रामुख्याने दिपक निकाळजे, श्रावण गायकवाड, विनय चव्हाण, अशोक बोर्डे, सिद्धार्थ गंगावणे, आनंद कस्तूरे, अमित वाहूळ, वसंतराज वक्ते, सचिन जोगदंड, शैलेंद्र मिसाळ, नागेश केदारे, श्रीरंग ससाने, अरविंद कांबळे, बंटी सदाशिवे, अंबादास रगडे, रामराव दाभाडे, कृष्णा शरणागत, संजय जाटवे, सिध्दोधन मोरे, कपिल बनकर, सोनु नरवडे, दिपक सरोदे, कैलास काळे, विमल दाभाडे, शकुंतला खरात, व्हि. टी. शिरसाट, भिमराव शेंडगे, संतोष चव्हाण, सुशिल भिशे, रामेश्वर हाडूलतीकर, अनामी मोरे, सचिन सिंगाडे, संतोष खिल्लारे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

## हॉटेलमध्ये आता 'शुद्ध पनीर'च मिळणार - मंत्री नरहरी झिरवाळ



**मुंबई :** हॉटेलमध्ये पनीरच्या नावाखाली स्वस्त आणि बनावट 'चीज ॲनालॉग' खपवून ग्राहकांची होणारी फसवणूक रोखण्यासाठी महाराष्ट्र सरकारने आता कडक पावले उचलली आहेत. पदार्थात नैसर्गिक पनीरऐवजी बनावट चीज ॲनालॉग वापरल्यास, त्याचा स्पष्ट उल्लेख मेन्युकार्ड किंवा इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले बोर्डवर करणे आता कायदेशीररित्या बंधनकारक करण्यात आले आहे. राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या आदेशानुसार, महाराष्ट्रात २७ एप्रिल २०२६ पासून ही विशेष मोहीम राबवण्यात येत असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या हॉटेल व्यावसायिकांवर कडक कारवाई केली जाणार आहे.

महाराष्ट्राने सुरू केलेल्या या मोहिमेची गांभीर्याने दखल घेत केंद्र सरकारच्या अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरणाने (FSSAI) हा नियम आता देशभर लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. FSSAI ने २१ एप्रिल २०२६ रोजी विशेष परिपत्रक काढून हा नियम सर्व राज्यांसाठी अनिवार्य केला आहे. शुद्ध पनीर आणि खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेबाबत महाराष्ट्राने दाखवलेली ही दिशा आता संपूर्ण देशासाठी मार्गदर्शक ठरली असून, यामुळे ग्राहकांची होणारी मोठी आर्थिक आणि आरोग्यविषयक फसवणूक थांबण्यास मदत होणार आहे.

विधानसभा सभागृहात लोकप्रतिनिधींनी पनीरच्या नावाखाली होणाऱ्या फसवणुकीचा मुद्दा उपस्थित केल्यानंतर, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी या तक्रारींची गंभीर दखल घेतली आहे. वनस्पतीजन्य तेलापासून तयार केलेले हे 'ॲनालॉग' हुबेहूब नैसर्गिक पनीरसारखेच दिसत असल्याने सामान्य ग्राहकांची मोठ्या प्रमाणावर दिशाभूल होत होती. ही फसवणूक रोखण्यासाठी मंत्री झिरवाळ यांनी हॉटेलमध्ये पारदर्शकतेचे कडक आदेश लागू केले असून, आता 'ॲनालॉग'चा वापर केल्यास तसा स्पष्ट उल्लेख करणे बंधनकारक असेल. महाराष्ट्राच्या या महत्त्वपूर्ण निर्णयाला केंद्र सरकारच्या FSSAI ने देखील पाठिंबा दिला असून, त्याबाबतचे अधिकृत परिपत्रक आता निर्गमित करण्यात आले आहे.

अन्न व औषध प्रशासन विभागाने जारी केलेल्या नवीन नियमांनुसार, १ मे २०२६ पासून प्रत्येक हॉटेल आणि रेस्टॉरंटला खाद्यपदार्थांबाबत पारदर्शकता राखणे बंधनकारक करण्यात आले असून, दुधाच्या नैसर्गिक पनीरऐवजी वनस्पतीजन्य फॅट्सपासून बनवलेले 'ॲनालॉग' वापरल्यास त्याची स्पष्ट माहिती ग्राहकांना देणे अनिवार्य असेल. या नियमाची कडक अंमलबजावणी केली जाणार असून, माहिती लपवणाऱ्या हॉटेल चालकांवर अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत कठोर कारवाई करून त्यांचा परवाना कायमचा रद्द केला जाऊ शकतो. ग्राहकांना आपण नक्की काय खातोय हे जाणून घेण्याचा पूर्ण अधिकार आहे आणि नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या भेसळखोरांची गय केली जाणार नाही, असा सज्जड दम मंत्री नरहरी झिरवाळ यांनी या निमित्ताने दिला आहे.

नवीन नियमांनुसार आता चीज ॲनालॉगच्या पुरवठादारांना विक्री बिलावर त्याचा स्पष्ट उल्लेख करणे बंधनकारक करण्यात आले असून, हॉटेल संघटनांशी सविस्तर चर्चा केल्यानंतर सर्व विभागीय अन्न आयुक्तांना या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. रेस्टॉरंट व्यावसायिक आणि केटरर्सना बल्क मेसेजद्वारे या नव्या नियमांची माहिती दिली जात असून, या पारदर्शकतेमुळे हॉटेलमधील 'शाही पनीर' सारखे पदार्थ आता खरोखरच शुद्ध मिळणार आहेत, ज्यामुळे भेसळ करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. तसेच ग्राहकांची दिशाभूल झाल्यास प्रशासनाच्या १८००-२२२-३६५ या टोल फ्री क्रमांकावर तक्रार नोंदवावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.

अन्न सुरक्षा मानके विनियम २०११ नुसार 'पनीर' हा केवळ दुधापासून तयार केलेला शुद्ध पदार्थ असणे अनिवार्य असताना, हॉटेल आणि उपाहारगृहांमध्ये सध्या खाद्यतेल, स्टार्च आणि इमल्सिफायर वापरून तयार केलेल्या 'चीज ॲनालॉग'चा सर्रास वापर होत असल्याचे दिसून आले आहे. दिसायला हुबेहूब पनीरसारखा असला तरी हा पदार्थ तांत्रिकदृष्ट्या पनीर नसल्याने, आता हॉटेल्सना त्यांच्या मेन्यूकार्ड, बिल आणि इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले बोर्डवर याचा स्पष्ट उल्लेख करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे ग्राहकांनी आणि व्यावसायिकांनी कोणताही पदार्थ खरेदी करताना किंवा वापरताना त्याच्या लेबलवर 'चीज ॲनालॉग' असा उल्लेख आहे का, हे काळजीपूर्वक तपासूनच शुद्धतेची खात्री करावी.

### जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २५ एप्रिल २०२६


## महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीला आंबेडकरांचे नाव द्या : सम्यक विद्यार्थी आंदोलनाची मागणी



**छत्रपती संभाजीनगर :** येथील महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीला भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे, अशी जोरदार मागणी सम्यक विद्यार्थी आंदोलन, विद्यार्थी तसेच जागरूक नागरिकांनी केली आहे. (अशी जोरदार मागणी सम्यक विद्यार्थी आंदोलन तसेच सामाजिक कार्यकर्तेच्या वतीने करण्यात आली आहे.) यासंदर्भात कुलगुरूंना निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे केवळ भारतीय संविधानाचे शिल्पकार नसून प्रख्यात विधिज्ञ तसेच सामाजिक न्याय, समता आणि मानवाधिकारांचे जागतिक प्रतीक आहेत. त्यांच्या कायदे व संविधान क्षेत्रातील योगदान अतुलनीय आहे. राष्ट्रीय विधी विद्यापीठ हे देशातील उच्च दर्जाचे विधी शिक्षण देणारे प्रमुख संस्थान असल्यामुळे अशा संस्थेला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देणे अत्यंत समर्पक ठरेल. यामुळे विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल तसेच न्याय, समता आणि संविधानिक मूल्यांची जाणीव अधिक दृढ होईल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच छत्रपती संभाजीनगर या प्रदेशाचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याशी ऐतिहासिक व भावनिक संबंध असल्याने या नामांतराला विशेष महत्त्व प्राप्त होते, असेही नमूद करण्यात आले आहे. या निवेदनाद्वारे महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीचे नामांतर करून "डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, छत्रपती संभाजीनगर" असे नाव देण्याची मागणी करण्यात आली आहे. या निवेदनाच्या प्रती मा.मुख्यमंत्री, राज्यपाल (कुलपती) तसेच संबंधित मान्यवरांना पाठविण्यात आल्या असून ई-मेलद्वारेही कळविण्यात आले आहे. तसेच विभागीय आयुक्त कार्यालयातील सी.ओ.एम. कार्यालयातही निवेदन सादर करण्यात आले आहे. या निवेदनावर सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष, विद्यार्थी नेते अक्रम खान, सामाजिक कार्यकर्ते अमरदिप हिवराळे, विकास रोडे, राहुल वाहूळ, अमोल घुगे, अक्षदा शिर्के आदींच्या स्वाक्षऱ्या असून प्रशासनाने याबाबत लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.






## अतिरिक्त शिक्षकांचे वेतन तत्काळ करा अन्यथा आंदोलन करू



**छत्रपती संभाजीनगर :** सर्व महाराष्ट्रातील अतिरिक्त कर्मच्याऱ्यांचे वेतन अतिरिक्त झाल्याने शासनाने थांबविले आहे. थांबविलेले वेतन तत्काळ करावे अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाने मा शिक्षण आयुक्त यांचाकडे मा शिक्षणाधिकारी मा यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. सन २०२५-२६ या वर्षात झालेल्या संचमान्यतेत अनेक शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी अतिरिक्त झालेले आहेत सर्व अतिरिक्त कर्मचारी नवीन रिक्त पदांवर रुजू होण्यासाठी इच्छुक आहेत. परंतु अनेक संस्थाचालक त्यांना रुजू करून घेण्यास इच्छुक नाहीत. यासाठी महाराष्ट्र शासन निर्णय १५.०३.२०२४ नुसार प्रक्रिया स्पष्ट केलेली आहे. परंतु या प्रक्रियेला बराच वेळ लागत आहे. या काळात अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन त्यांच्या मुळ शाळेतूनच काढण्यात यावे शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांना दरमहा वेगवेगळ्या बँकेचे मासिक हाफ्ते भरावे लागतात. तसेच यामुळे कर्मचाऱ्यांचे कुटुंब आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करत आहे. अनेक कर्मचाऱ्यांचा पाल्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अनेक शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचे लग्न सुद्धा आहेतया सर्व समायोजन प्रक्रियेत शिक्षक सकारात्मक आहे आणि शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा काहीही दोष नाहीमराठवाडा शिक्षक संघाची न्याय आणि घटनादत्त एकमेव मागणी नसता मराठवाडा शिक्षक संघ आपल्या कार्यालयासमोर लोकशाही पद्धतीने अभिनव मार्गाने आंदोलन करेनार आहे भाई चंद्रकांत चव्हाण यांच्या नेतृत्वात शिक्षणाधिकारी अश्विनी लाटकर यांना नवनाथ मंत्री अशोक ढमढेरे विनोद केनेकर रावसाहेब बोरसे विलास चव्हाण कृष्णा गोंडे मनोज चव्हाण राहूल दिवेकरपडघन सर शैलेश पाटील हे उपस्थित होते.

## वाहतात आनंदाचे वारे

तू मिठीत घेता मजला, दुःख सारे विसरलो.
तुझ्या प्रेमात पडून मी, नको तिथे घसरलो.

मिठीत तुझ्या येताच, मन माझे सावरले.
अचानक अदृश्य होताच, मन माझे घाबरले.

तुझ्या मिठीत आहे, जीवनातले सुख सारे.
अवतीभवती वाहत आहे, आता दूषित वारे.

तुझ्या मिठीत येताच, मन आनंदाने नाचते.
तुला मिळविण्यासाठी, रात्रंदिवस वाचते.

तुझ्या मिठीत मिळते, मनाला आनंद खूप.
मिठीत तुझ्या आल्यावर, बदलून जाते रूप.

तुझ्या मिठीत मजला, पृथ्वीवर स्वर्ग दिसते.
तुझ्या मिठीत येताच , मन आनंदाने हसते.
तुझ्या मिठीत आहे, विश्वातले सुख सारे.
तुझ्या मिठीत येता, वाहतात आनंदाचे वारे

**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २४ एप्रिल २०२६


## कलमुगळी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



**निलंगा (प्रा. नागसेन कांबळे)** : तालुक्यातील कलमुगळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती अतिशय उत्साहात आणि शांततेत पार पडली. १४ एप्रिलपासून जयंतीनिमित्त भव्य अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये भाषण स्पर्धा निबंध स्पर्धा आणि प्रश्नमंजुषा या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. गावातील असंख्य मुला मुलींनी सहभाग घेऊन स्पर्धेचे रंजकता वाढवली व आपले कौशल्य पणाला लावून स्पर्धा जिंकण्याचा प्रयत्न केला. या स्पर्धेत विजेत्यांना पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. या भव्य अशा कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून देवी हल्लाळी येथील पंचायत समिती सदस्या सौ. श्रीदेवी सर्जे, कलमुगळी येथील सरपंच सौ. मनीषा सूर्यवंशी उपसरपंच किसन पाटील आणि सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष प्रा. डॉ. उमाकांत सूर्यवंशी हे उपस्थित होते. सर्वांनी पारितोषक विजेत्यांचे कौतुक करून डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली व भीम जयंती शांततेत पार पाडण्याचे विनम्र आव्हान केले. या कार्यक्रमाला कलमुगळी येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये उत्सव समितीचे सर्व कार्यकर्ते उपाध्यक्ष लक्ष्मण सूर्यवंशी, दिगंबर सूर्यवंशी, शिवदास सूर्यवंशी, संतोष सूर्यवंशी, दिलीप सूर्यवंशी, परमेश्वर सूर्यवंशी, किशोर सूर्यवंशी, भीम गायकवाड, अरविंद सूर्यवंशी, मारुती सूर्यवंशी, धोंडीबा सूर्यवंशी, महेंद्र सूर्यवंशी ,अमोल सूर्यवंशी, रोहिदास सूर्यवंशी, प्रा. डॉ. डी .एस. सूर्यवंशी इत्यादी व्यक्तींनी आवर्जून आपली उपस्थिती दर्शवली. भारतीय बौद्ध महासभा कलमुगळी शाखेच्या अध्यक्ष सौ. नीला गायकवाड सौ .रुक्मीन सूर्यवंशी आशा सूर्यवंशी लोचना सूर्यवंशी, सविता सूर्यवंशी, बेगडा सूर्यवंशी लक्ष्मी शिंगारे ,उर्मिला सूर्यवंशी. तसेच संघर्ष ग्रुपचे प्रमोद गायकवाड, धीरज सूर्यवंशी, मंगेश सूर्यवंशी राजू गायकवाड, प्रीतम सिंगारे, सुधाकर सूर्यवंशी, सम्यक ज्येष्ठ नागरिक संघाचे सदस्य श्री नागोराव सूर्यवंशी, अंगद सूर्यवंशी, अंकुश सूर्यवंशी, पांडुरंग सूर्यवंशी, रंगराव सूर्यवंशी ,विश्वनाथ सूर्यवंशी, महादू सूर्यवंशी, तातेराव सूर्यवंशी, रुक्मिणी सूर्यवंशी यांच्यासह गावातील असंख्य समाज बांधव मिरवणुकीस उपस्थित होते. दरवर्षीप्रमाणे गावातील प्रमुख रस्त्याने अतिशय शांततेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची रथातून भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली. यावेळी सर्व सहभागींचा उत्साह शिगेला पोहोचला होता.सरतेशेवटी त्रिशरण , पंचशील व बुद्ध वंदना घेऊन या मिरवणुकीचे यशस्वी सांगता करण्यात आली.

## साखरे बोरगांव ची भूमीकन्या.हर्षदा चव्हाणचे" एमपीएससी" परीक्षेत यश



**पाटोदा (प्रतिनिधी)** : बीड तालुक्याती बालाघाटावरील मौजे साखरे बोरगांव ची भूमीकन्या व राज्य सहकारी बँकेचे श्री. विष्णु चव्हाण साहेब यांनी कन्या ईंजि. हर्षदा विष्णू चव्हाण यांनी खरगपूर येथून आयआयटी पदवी पूर्ण केली. महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगा मार्फत [MPSC] मार्फत नगर विकास विभागात सहाय्यक नगर रचनाकार [ Town planner ] पदाच्या परीक्षेत महाराष्ट्रात 7 वा रँक मिळवून महाराष्ट्रातुन मुलीमधुन दुसरी येण्याचा मान मिळवला आहे. घवघवीत यश मिळविल्या बद्दल कु. हर्षदा चव्हाण हीचा बीड येथे सत्कार करण्यात आला. कु .हर्षदा चव्हाण यांचा भाऊ चि. विक्रांत चव्हाण हे पण एमपीएससी परीक्षेतुन बांधकाम विभागात बार्शी येथे कार्यकारी अभियंता पदावर कार्यरत आहेत. कु. हर्षादा चव्हाण व तिच्या आई वडिलांचे बंकटस्वामी संस्थानचे मठाधिपती ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे, ह.भ.प.नाना महाराज कदम, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख मा.श्री. अनिलदादा जगताप माजी नगरसेवक श्री. अरुण चौरे, शिवसंग्रामचे श्री. सुहास पाटील, बालरोग तज्ज्ञ डॉ.प्रदिप शेळके, साखरे बोरगांवचे माजी अग्नीशमन अधिकारी शिवाजीराव झनझन माजी दारूबंदी अधिकारी राम नाईकवाडे, कैलास कुटे, दत्ता घरत, सरपंच गजानन घरत पोलीस पाटील तुकाराम घरत,चेअरमन राजेंद्रनाना घरत,माजी सरपंच बाबासाहेब देवगुडे, सखाराम जाधव, विश्वाबंर जाधव वसंत जगदाळे, विश्वाबंर जगदाळे,राजेंद्र घोडके, अशोक गाढवे, प्रा. कृष्णा झनझन, प्रा.डॉ. अशोक देवगुडे व समस्त गावकऱ्यांच्या वत्तीने हार्दिक अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

लवकरच बालाघाटावर तिचा जाहीर सत्कार करण्यात येणार आहे. कु. हर्षादा चव्हाण यांनी मिळवलेल्या यशामुळे त्यांचे सर्व स्तरातुन अभिनंदन होत आहे







महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २५ एप्रिल २०२६

# अतनुर ता. जळकोट येथे ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाची उत्साहात सांगता





**मुरुम (प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले)** : महाराष्ट्रातील संत परंपरा ही भक्ती, समता आणि समाजप्रबोधनाचा एक संपन्न वारसा आहे. ज्ञानेश्वरांनी रचलेला पाया, नामदेवांनी केलेला विस्तार, एकनाथांनी दिलेला आधार आणि तुकोबांच्या कळसाने सजलेला वारकरी संप्रदाय महाराष्ट्राच्या संस्कृतीचा कणा आहे. संत-कवयित्री बहिणाबाईंनी या परंपरेचे वर्णन 'ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस' असे केले आहे, जे संतांचे अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित करते .महाराष्ट्रातील प्रमुख संत आणि त्यांचे कार्य:संत ज्ञानेश्वरानी संत परंपरेचा पाया, 'ज्ञानेश्वरी'द्वारे मराठीत तत्त्वज्ञान आणले .संत नामदेवानी विठ्ठलभक्त आणि निर्भीड अभंगकार, ज्यांनी भक्तीचा प्रसार केला .संत एकनाथानी समन्वयवादी संत, भारूडांद्वारे समाजप्रबोधन केले .संत तुकारामानी अभंगांची क्रांती, सामान्य माणसाचा संतकवी म्हणुन ओळख.संत चोखामेळा यानी समतेचा पुरस्कार करणारे दलित संत .संत जनाबाई विठ्ठलभक्तीला घरकामात पाहणारी स्त्री संत.संत सावता माळी श्रमालाच ईश्वर मानणारे शेतकरी संत.समर्थ रामदास स्वामी दासबोध, शिवरायांचे मार्गदर्शक .संत परंपरेची प्रमुख वैशिष्ट्ये:वारकरी संप्रदाय: 'राम कृष्ण हरी' हा मंत्र, पंढरपूरची वारी, आणि विठ्ठल ही भक्तीची मुख्य देवता .सामाजिक समता जात-पात विसरून सर्वसामान्यांना भक्तीचा मार्ग दाखवणे .लोकभाषा अभंग, ओवी या सोप्या, मराठी भाषेतून तत्त्वज्ञान मांडले.समन्वय भक्तीसोबतच समाज सुधारणेचा प्रयत्न .संत साहित्याचे महत्त्व-संत-परंपरेने महाराष्ट्राला एक नवीन विचारसरणी दिली. संतांनी देह झिजवून समाजउद्धाराचे कार्य केले, ज्यामुळे माणसाने माणुसकी आणि भेदभावरहित जीवन जगण्याचे शिकले. त्यांच्या अभंगांनी सामाजिक समतेची गुढी उभारली आणि मराठी मनाला एकसंध ठेवले. ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, एकनाथ, चोखामेळाया संतांनी आपल्या कार्यातून आणि साहित्यातून महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक जडणघडणीत मोलाची भूमिका बजावली आहे.महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. म्हणून या भूमीला खऱ्या अर्थाने संत परंपरेच अनुष्ठान लाभलं आहे. संत परंपरेमुळे महाराष्ट्राला मोठा वारसा लाभला आहे. याच माध्यमातून हा वारकरी संप्रदाय खऱ्या अर्थाने संपूर्ण जगभरात पोहोचायला मदत झाली. संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत गोरा कुंभार, संत चोखामेळा, संत जनाबाई, संत तुकाराम, संत नामदेव, संत निवृत्तीनाथ, संत मुक्ताबाई, संत सावता माळी, संत सोपानदेव यांच्यासोबतच अनेक संतांनी आपल्या अभंगातून, निरुपणातून समाजाला एक सकारात्मक दिशा देण्याच काम केलं. अतनुर येथे श्री संजीवन समाधी असलेले घाळेप्पा स्वामी महाराज यांच्या नांवाने हा अखंड हरिनाम सप्ताह असतो. संजीवन समाधी म्हणजे एका व्यक्तीने स्वतःच्या इच्छेने, खोल ध्यान अवस्थेत प्रवेश करून, आपल्या शारीरिक देहाचा त्याग करणे. याला अनेकदा 'जिवंत समाधी' देखील म्हटले जाते, कारण व्यक्ती जिवंत असतानाच या अवस्थेत प्रवेश करतो. संजीवन समाधी घेणाऱ्या व्यक्तीचा आत्मा आणि शरीर हे एका विशिष्ट स्थितीत प्रवेश करतात, जिथे ते पूर्णपणे विलीन होतात. संजीवन समाधी घेतलेले श्री घाळेप्पा स्वामी महाराज यांची 150 वी पुण्यतीथी साजरी करण्यात आली. ज्या घाळेप्पा स्वामी महाराज जिवंत समाधी घेतल्यानंतर पुर्ण एक वर्षानंतर समाधी काढण्यात आली तेव्हा त्यांचा डावा डोळा ऊघडा होता. तसेच समाधी घेते वेळी लावलेला दिवा एक वर्षानंतही तेवत होता. यावरुन संजिवन समाधिस्थ श्री घाळेप्पा स्वामी महाराजांचे देवत्व सिध्द होते. यामुळेच अतनूर पंचक्रोशी मधे श्री घाळेप्पा स्वामी महाराजाचे संतत्व आहे. महाराज नवसाला पावणारे,संकट समयी भक्ताला मदत करणारे अशी गाढ श्रध्दा आहे. महाराजाचा पुजनीय वार सोमवार आहे.श्रावण महिन्यात श्री घाळेप्पा स्वामी महाराज फक्त बेलपत्री खाऊनच अनुष्ठाण करत असत म्हणुनच की काय महाराजाना दुध साखरेचा नैवेद किंवा दुधातील दशमीचा नैवैद दाखवला जातो.वारकरी संप्रदायामध्ये अखंड हरिनाम सप्ताहाला मोठे महत्त्व आहे. यामध्ये सात दिवस विविध प्रकारचे संत वाङमयाचा अभ्यास करणाऱ्या हरिभक्त परायण महाराजांकडून संत ज्ञानेश्वरांपासून संत तुकाराम पर्यंत विविध संतांच्या रचना असलेल्या अभंगावर तत्वचिंतन मांडण्यात येते. ज्याद्वारे मनुष्य जन्मात ईश्वर नामाचे विशद केले जाते.वैशाख प्रतिपदा 1 ते वैशाख शुद्ध सप्तमी पर्यंत अखंड हरिनाम सप्ताहाचा समारोप शुक्रवारी पुरुषोत्तम पाटील महाराजाच्या काल्याच्या किर्तनाने करण्यात आला.जळकोट तालुक्यातील अतनुर येथे अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता हजारो जनसागराच्या साक्षीने भक्तिमय वातावरणात झाली. अतनुर येथे अखंड हरिनाम सप्ताह भक्तिमय वातावरणात गेली सात दिवस सुरू होता. या सात दिवसांमध्ये दररोज भजन व पहाटे पाच वाजता काकड आरती होत होती. या सप्ताहाची बुधवारी ज्ञानेश्वर माऊलीच्या पालखीची गावात पायी दिंडी व शोभायात्रा काढण्यात आली. पायी दिंडी व शोभायात्रा मुख्य बाजार रस्त्यावरुन अंबाबाई मंदीर मार्गे बस स्टॅड मार्गे पाटलाच्या ईनामातुन कुंभार गल्ली,शाळेच्या मैदान अशी परिक्रमा करून भजनी मंडळीच्या हरिनामाच्या गजरात ढोल ताशाच्या निनादात व फटाक्याच्या आतिषबाजीत संपूर्ण गावातफिरून पायी दिंडी व शोभायात्रा परत शेवटी श्री काशी विश्र्वनाथ महाराज व संजीवन समाधी श्री घाळेप्पा स्वामी महाराज यांच्या पवित्र देवस्थान असणाऱ्या मंदिरात आली. पायी दिंडी व शोभायात्रा निघाली असता यात बालगोपालांसह टाळकरी महिला पुरुषांनी टाळमृदुंगाच्या आवाजावर फुगडीचा ठेका धरला. ज्ञानदेव तुकाराम च्या गजरात संपूर्ण परिसर मंत्रमुग्ध झाला होता. सात दिवस चाललेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची ह.भ.प. श्री पुरुषोत्तम पाटील महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता झाली. व नंतर लगेच अन्नदाते सुर्यकांत पांचाळ व अतनुर ग्रामस्थ मंदिर समिती कडुन ठेवणण्यात आलेल्या महाप्रसादाला सुरुवात झाली. या महाप्रसादाचा लाभ अतनुर परिसरातील हजारो भाविक भक्तांनी घेतला. अशाप्रकारे गेल्या सात दिवसापासून सुरू असलेल्या सप्ताहाच्या सांगतेने शहर हरिनामाच्या गजरात, ढोलताशांच्या व फटाक्यांच्या अतिषबाजीने अक्षरक्षः दुमदुमले होते.या पालखी सोहळ्यामधे महिला भावाकाचा मोठ्या प्रमाणात डोक्यावर कळस,तुळशी वृदांवन घेउन विविध कला प्रकार सादर करण्यात आले.पालखी गावातील मुख्य रसत्यावरुन जात असताना ग्रामस्थाकडुन थंड पाणी,मठ्ठा,खिचडी,रसना,चहा अशा प्रकारचे पेय देउन स्वागत करण्यात आले. आजचे वैशिष्ट्यै म्हणजे मुस्लिम समाजाकडुनही थंड पाणी व केळीचे वाटप करण्यात आले.मुस्लिम युवकाचाही यात मोठ्या प्रमाणात सहभाग होता.माजी सैनिक आयुब शेख व ईस्माईल मुजेवार,आसाब मुंजेवार,शादुल मुंजेवार,बाबु मुंजेवार,चांदसुरज महागमे,मुबारक अतार,सलीम मुंजेवार,महेबुब शेख,रमजान तांबोळी,मेहराज मणियार,आशिफ पठाण,अलताफ शेख,असलम मूंजेवार,हज्जु मुंजेवार यांचाही सहभाग होता.या सप्ताह यशस्वितेसाठी कमिटी अध्यक्ष विकास सोमुसे,ऊपाध्यक्ष गोविंद पाटील येवरे,हभप दयानंद स्वामी,प्रकाश पोलीस पाटील,चंद्रकांत जोशी गुरुजी,नामदेव कोकणे,माधव सोमूसे,सुर्यकांत पांचाळ,किसन मुगदळे,नामदेव कोकणे,चंद्रकांत जोशी,खजिनदार बाबु पंचगल्ले गुरूजी,दिलीप पाटील,प्रमोद संगेवार,बाळु कोडगीरे,अशोक पाटील माजी सभापती कृषी ऊत्पन्न बाजार समिती उदगीर,मारुती गुंडीले,श्रीधर पाटील गव्हाणे,श्रीमती मन्याबाई मधुकर पत्तेवार,पत्रकार संजय शिदे या सर्वांनी सप्ताह यशस्वी पार पाडण्यासाठी गेली दोन महिने मोलाचे योगदान व सहकार्य केले . मंदिरावर पुजेची व्यवस्थापक म्हणुन बाबु कदम, बाबु साकोळकर,गुरुनाथ कापसे यांनी मोलाचे सहकार्य केले.तसेच अन्य काही मंडळीनी आपल्या दिलेली जबाबदारी चोख पार पाडली व सात दिवसाचे अन्नदाते म्हणुन श्री काशी विश्र्वनाथल महाराज मंदिर संमिती तर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला

## ईशानचे दप्तर

ईशानचे दप्तर
किती किती मोठे
सर्व पुस्तकांची
त्यात गर्दी दाटे

ईशाच्या दप्तरात
पुस्तक, वह्या,पाटी
सोबत वाॅटरबॅग
नी कंपास पेटी

पाठीवरील दप्तर
जड झालय किती
तरी टिफीन दिसतो
ईशानच्या हाती

दप्तराच्या ओझ्याने
ईशानची दुखते पाठ
तरी गुरूजी म्हणतात
उभे रहा ताठ !

केव्हा कमी होणार
पाठीवरील भार?
ओझं कमी केलं की
बसतो गुरूजींचा मार



- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106

प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103